MHWS08001517-2023

## निशाणी २८ वरील आदेश

प्रस्तूत अर्ज वादी यांनी नि.२२ वरील दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ प्रमाणे दाखल केलेला अर्ज हा प्रतिवादींनी दाखल केलेल्या नि.क्र.२६ वरील दुरुस्ती अर्जाच्या आधी निकाली काढण्याकरिता दाखल केला आहे.

२. वादींचे कथन की, वादींनी नि.क्र.२२ वर दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. त्यानंतर प्रतिवादींनी नि.क्र.२६ वर दुरुस्तीचा अर्ज दाखल केलेला आहे. वादींनी नि.क्र.२२ वर दाखल केलेला अर्ज हा आधी दाखल केलेला आहे. त्यामुळे एकवेळ दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ प्रमाणे अर्ज दाखल झाल्यानंतर तो आधी निकाली काढणे गरजेचे आहे. त्यामुळे वादी तर्फे प्रस्तुत अर्ज मंजुर होण्याची विनंती केली आहे.

३. सदर अर्जावर प्रतिवादी यांचे म्हणणे मागविण्यात आले. त्यांनी सदर अर्जास प्रखर विरोध दर्शविला आहे. प्रतिवादी यांचे कथन की, वादीने कथन केल्याप्रमाणे कायदयामध्ये एखादा अर्ज अगोदर निकाली काढण्याची तरतूद नाही. प्रतिवादींनी प्रतिदाव्यामध्ये दुरुस्ती करण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे. त्यामुळे प्रतिवादींना प्रतिदाव्यामध्ये दुरुस्ती करण्याची संधी देणे गरजेचे आहे. त्यामुळे दोन्ही अर्ज एकाचवेळी निकाली काढणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी सदर अर्ज नामंजूर होण्याची विनंती केली आहे.

४. अर्ज व त्यावरील म्हणणे याचे अवलोकन केले. तसेच दोन्ही बाजूंकडील युक्तीवाद विचारात घेतला. वादी तर्फे मा. सर्वोच्च न्यायालय यांचे आर.के. व रोजा ..वि.

<u>यु.एस. रायडु व इतर २०१६ (५) ऑल एम.आर.४४६</u> या न्यानिर्णयावर भिस्त ठेवली आहे. मा. सर्वोच्च न्यायालय यांनी, दाव्याच्या कोणत्याही टप्यावर व दाव्याची चौकशी पुर्ण होण्याआधी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ प्रमाणे अर्ज दाखल करता येईल तसेच सदर अर्ज दाखल झाल्यानंतर न्यायालयाला सदर अर्ज न्यायनिर्णीत केल्याशिवाय दाव्याची पुढील चौकशी सुरु करता येणार नाही, असे न्यायनिर्देशित केलेले आहे.

**५.** प्रस्तुत दाव्याचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, प्रस्तुतचा दावा वादींनी प्रतिवादींविरुध्द वाद मिळकतीचे वाटपाकारिता, स्वतंत्र ताब्याकरिता तसेच दि.०३.११.२०२० रोजीचे बक्षिसपत्र रद्द होवून मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. सदर दाव्यास प्रतिवादींनी लेखी कैफियत तसेच प्रतिदावा दाखल केलेला आहे. सदर प्रतिदाव्यास वादींतर्फे म्हणणे दाखल केलेले आहे. त्यानंतर वादी तर्फे नि.क्र.२२ वर दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ अन्वये प्रतिदावा नामंजूर होण्याकरिता अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्जावर वादी तर्फे म्हणणे दाखल केलेले आहे. सदर अर्ज सुनावणीसाठी प्रलंबित असतांना प्रतिवादी यांनी नि.क्र.२६ वर अर्ज दाखल करुन प्रतिदाव्यामध्ये दुरुस्ती करण्याची विनंती केलेली आहे. वादी यांनी नि.क्र.२२ वरील दाखल केलेला अर्ज तसेच प्रतिवादी यांनी नि.क्र.२६ वर दाखल केलेला अर्ज यांचे अवलोकन केले असता, प्रतिवादी यांनी विनंती केलेली दुरुस्ती ही वादी यांनी नि.क्र.२२ वर दाखल केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने आहे. त्यामुळे नि.क्र.२२ वरील अर्ज न्यायनिर्णीत करत असतांना नि.क्र.२६ वरील अर्ज विचारात घेणे देखील गरजेचे आहे. त्यामुळे दोन्ही अर्जातील वस्तुस्थिती व कायदेशीर मुद्दे विचारात घेता नि.क्र.२२ वरील अर्ज व नि.क्र.२६ वरील अर्ज यावर एकत्रीत सुनावणी घेवून सदर दोन्ही अर्ज गुणदोषावर निकाली करणे योग्य व न्यायोचित होणार आहे. त्यामुळे वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट दोन्ही अर्ज गुणदोषावर निकाली होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे केवळ वादीच्या विनंतीप्रमाणे नि.क्र.२२ वरील अर्ज अगोदर निकाली करणे योग्य होणार नाही. करिता खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहेः

नि.दि.दा.१०५/२०२३
रविंद्र व इतर ..वि.. विजय व इतर

**आ दे श**

१. नि.क्र.२८ वरील अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. वादी व प्रतिवादी यांनी नि.क्र.२२ व नि.क्र.२६ यावर एकत्रीत सुनावणी करावी.

(आदेश खुल्या न्यायालयात जाहीर)

DINESH MUKUND GAIKWAD
Digitally signed by DINESH MUKUND GAIKWAD
Date: 2025.06.26 17:21:52 +0530

( दिनेश मु. गायकवाड )
दि.२५/०६/२०२५ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, रिसोड.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File Order are same word to word, as per the original **Order**.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | B. V. Bhisade (Grade-III) |
| Name of court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Risod. |
| Date | : | 25.06.2025 |
| Order signed by the Presiding Officer | : | 25.06.2025 |
| **Order uploaded on** | **:** | **26.06.2025** |